श्री     आसवे

१५३८

आसवे होतात जेव्हा पोरकी
ना कुणाच्या वारसा ठाऊक त्यांना
काजळी विसावतो त्यांच्या कुशीशी
ना स्वतःच्या आरसा ठाऊक त्यांना . १

सहृदयतः भावनेतून जन्म त्यांचा
तर मुक्यांना का आंधळ्यांनी होत नाही
आसवे येतात काढून कोणजाणे
बोध होतो हरघडी पण शोध नाही - २

आसवांचा रंग कोणी पाहिला का ?
इन्द्रधनुही लाजतो पाहून त्यांना
निथळत्या आसवांशी खेळतांना (स्नेह जोडी)
रंग भरतो तन्मनी घेऊन त्यांना - ३

आसवांची जात खरे स्वातंत्र्यप्रेमी
इमान नीतीचा अर्थहि त्यांनाच ठावे
जीवनाच्या सार्थकासाठी गळ्यांनो
आस्तित्व त्यांचे घेऊनि जगास यावे - ४

दि २०/५/८९